RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ७, अंक १२] गुरुवार, सप्टेंबर ३०, २०२१/आश्विन ८, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. . . . . . | १-३ |

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० सप्टेंबर २०२१.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2021.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; १९४९ चा ५९.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मधील पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर तीन पालिका सदस्य, परंतु दोनपेक्षा कमी नाहीत व चारपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :". २०२१ चा महा. अध्या. ४

## निवेदन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या विद्यमान तरतुदींनुसार, महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून फक्त एक पालिका सदस्य निवडून देण्यात येतो. राज्यातील महानगरपालिकांच्या क्षेत्रातील कोविड-१९ साथरोगामुळे उद्‌भवलेल्या आरोग्यविषयक संकटाला तोंड देत असताना, महानगरपालिकांमध्ये बहु-सदस्यीय प्रभाग पद्धती असणे आवश्यक आहे असे वाटते. अशा स्थितीचा आढावा घेतल्यानंतर आणि महानगरपालिकांचे कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने, राज्य शासनास उक्त अधिनियमाच्या तरतुदींमध्ये यथोचितरित्या सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर तीन पालिका सदस्य, परंतु दोन पालिका सदस्यांपेक्षा कमी नाहीत व चार पालिका सदस्यांपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्या प्रयोजनाकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम ५ मध्ये यथोचितरित्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, आणि म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक ३० सप्टेंबर २०२१.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**महेश पाठक,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.